Golden Research Thoughts
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN : 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume -5 | Issue - 9 | March - 2016

# ग्रामीण साहित्यात ग्रामीण चळवळीचे योगदान



गलंडे लक्ष्मी दगडूजी
न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली. ता.जि.हिंगोली.

**प्रस्तावना :-**

ग्रामीण साहित्य म्हणजे काय ? आणि त्यांच्या प्रेरणांचा शोध घेतांना ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे काय ?, तीचा ग्रामीण साहित्याशी काय संबंध आहे हे पाहाणे गरजेचे आहे. 'ग्रामीण' या संज्ञेचा आणि ग्रामीण साहित्य म्हणजे काय याचा सविस्तर अभ्यास आपण वर केला आहे. ग्रामीण साहित्याला पन्नास साठ वर्षाची परंपरा दिसते. तरी सुध्दा मागील तीस वर्षात ग्रामीण साहित्य हे चांगले बहरू लागले आहे. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा विचार केला तर ग्रामीण साहित्याचे व्यासपीठीय चर्चासत्रे, साहित्य संमेलने, शिबिरे होण्याच्या घटनेला या साहित्याची चळवळ म्हटले जाऊ लागले १९६० नंतर ग्रामीण व दलित साहित्य प्रवाह आले. या प्रवाहाला गती देण्यासाठी साहित्यकांनी जी धडपड केली त्या धडपडीला चळवळ म्हणता येईल. यातुनच १९६७ ला दलित साहित्याची चळवळ सुरु होऊन काही वर्षानंतर जवळपास दहा अकरा वर्षानंतर ग्रामीण साहित्य चळवळीला सुरुवात झाली. साहित्यनिर्मिती ही प्रतीभेच्या जोरावर होत असते. त्यामुळे धडपडीने किंवा चळवळीने साहित्य निर्माण होऊ शकत नाही. असे काहींचे मत असले तरी ज्या गोष्टी बद्दल व्यक्ती, स्थानाबदल आपल्याला तळमळ कळवळा आहे. त्याबद्दल आपण चांगल्या प्रकारे लिहू शकतो. त्यामुळे चळवळीमुळे समुध्द असे ग्रामीण साहित्य निर्माण होऊ लागले. कोणतीही चळवळ कांही उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठीच जन्मत असते. ग्रामीण साहित्याचा विचार केला तर सुरुवातीच्या काळात जे ग्रामीण साहित्य लिहिले गेले ते वास्तवापासून दूर असे स्वप्नरंजनात्मक व मनोरंजनाच्या हेतुने लिहिले होते. त्या साहित्याला वास्तवता आणण्यासाठी १९७७ मध्ये ग्रामीण साहित्य चळवळ अस्तित्वात आली असे म्हणता येईल. ही चळवळ सुरु होण्यापाठीमागची भूमिका मांडतांना आनंद यादव यांनी आपले मत असे नोंदवले आहे. ''पुर्व सुरींनी निर्माण केलेली ग्रामीण साहित्याची कोंडी फुटावी दलित साहित्याने निर्माण केलेल्या साधनत्वातुन मराठी दलित साहित्य मुक्त व्हावे आणि समग्र मराठी जीवनाला सामोरे जावे स्वत:च्या देशी परंपरेचा शोध त्याने घ्यावा नवतरुणांच्या व्यक्तिमत्वाचा

सामाजिक सांस्कृतिक अंगाने विकास व्हावा, त्याला स्वत्व शोधता यावे नव्या आधुनिक खेड्याला वाड्.मयाचा नवा वारसा मिळावा खेड्यातले वाड्.मयीन वृत्ती प्रवृत्तीने अंकुर कोमेजु नयेत या खेड्यांना साहित्य जागरण व नवसंस्कृती जागरण याचा स्पर्श व्हावा म्हणून ही चळवळ सुरु झ ाली''[१].

ग्रामीण साहित्य चळवळ ही साहित्यिकांना त्यांच्या वास्तवाची जाण करून देण्याचा प्रयत्न करते आपल्या संस्कृतीचा आपल्या समाजजीवनाचा त्यांनी वास्तवतेने शोध घ्यावा हा मुख्य उद्देश ग्रामीण साहित्य चळवळीच्या पाठीमागे असलेला दिसतो. ग्रामीण साहित्य चळवळीला एक वारसा आहे. महात्मा फुलेंच्या मानवतावादाचा वारसा ती सांगते तसे बघितले तर या चळवळीच्या पाठीमागे कुण्या एका विचारवंताची प्रेरणा नाही. या संदर्भात डॉ. कैलास सर्विकर म्हणतात की, ''या आवश्यकते पोंटी निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याच्या चळवळीला कोणा एका विचारवंताच्या विचारांचीच प्रेरणा आहे. असे नाही तर ; महाराष्ट्रात महात्मा फुल्यांपासून जी सामाजिक परिवर्तनाची शैक्षणिक उत्थानाची चळवळ उभी राहिली त्या चळवळीतील विचारवंत व कार्यकर्त्यांच्या कार्याची परंपरा आहे''[२].

ग्रामीण साहित्य चळवळीच्या पाठीमागे कुण्या एका विचारवंताची प्रेरणा जरी सांगता येत नसली तरी १९२५ च्या दरम्यान महात्मा गांधींनी खेड्याकडे चला चा मुलमंत्र दिला त्यामुळे या काळात महात्मा गांधी हे ग्रामीण साहित्य चळवळीचा प्रेरणास्त्रोत ठरतात.

साहित्य म्हणजे केवळ भाषेच्या दृष्टीने केलेली कृती असे होत नाही. तर साहित्य हे जीवनाशी संबंधीत असल्यामुळे तो एक सामाजिक व सांस्कृतिक भाग असतो. भाषेचा वेगळा विचार करता येत नाही. कारण भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. या दृष्टीने जर विचार केला तर ग्रामीण साहित्याची सुध्दा ग्रामीण जीवनाशी, संस्कृतीशी, भाषेशी निगडीत अशी चळवळ आहे. एका अर्थाने ग्रामीण साहित्याची चळवळ ही संस्कृतिक चळवळ आहे. या चळवळीचा उद्देश ग्रामीण जीवनात व समाजात परिवर्तन घडविणे हा आहे. ही चळवळ समाजवर आणि समाज परिवर्तनाच्या दिशेने साहित्यावर संस्कार करणारी आहे.

समाजाला योग्य आकार देण्याच्या उद्देशाने या चळवळी निर्माण झाल्या आहेत. कोणत्याही चळवळीमागे केवळ साहित्यानिर्मित करणे एवढाच उद्देश नसतो तर ग्रामीण साहित्यचळवळीचेही तसेच आहे. या चळवळीला जीवनात विशेषत ग्रामीण जीवनात जे शोषण आहे. त्या विरुध्द संघर्ष करून मानवतावादावर आधारीत समाजाची रचना करायची आहे. ही चळवळ जात धर्म, वर्ण अशा चौकटीत अडकुन पडू इच्छित नाही. तिचा तसा उद्देशही नाही. संपुर्ण समाजाला एकत्र बांधू पाहणारी व समाजात मुलभुत परिवर्तन घडवू पाहणारी चळवळ होय. दुसरे असे की ग्रामीण साहित्याच्या चळवळीत सहभागी होऊन घोषण देऊन मोठे रान उडवायचे आहे. असे या चळवळीत सहभागी झालेल्या लेखक वाचकाला वाटले नव्हते आणि तो चळवळीचा हेतुही नव्हता. नव्या वाटा शोधण्याचा तो काळ होता. ग्रामीण जीवनातील अनुभव ग्राम जाणीवेतुन व्यक्त करणा-या साहित्याला ग्रामीण साहित्य असे संबोधले जाते. या ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या अनुषंगाने 'चळवळ' या शब्दासंबंधी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''असा जीवनानुभव, जाणीवा व्यक्त करणा-या साहित्याची चळवळ आज ग्रामीण साहित्याची चळवळ म्हणून ओळखली जाते या दृष्टीने चळवळ म्हणजे काय हे समजुन घेणे योग्य ठरेल. चळवळ यांचा शब्दकोशातील अर्थ चलनवलन, हालचाल, उद्योग, गडबड असा होतो. खरे तर ही चळवळ त्या काळात प्रभावपुर्ण होत असलेल्या परिस्थितीच्या पंरपरेच्या दबावाविरुध्द ची प्रतिक्रिया असते''[३].

कोणतीही एखादी चळवळ एका एकी सुरु होत नाही. ग्रामीण साहित्य चळवळीचा जन्म ही अशाच अनेक समस्यातुन झाला. ग्रामीण जीवनातील अन्याय अत्याचार, शोषण यांना विरोध करून ग्रामीण जीवनात परीवर्तन घडवून आणणे हा ग्रामीण साहित्य चळवळीचा उद्देश होता. या समस्यांचा विचार करतांना प्रामुख्याने स्वातंत्र्यपुर्व काळातील सामान्य माणसांनी जी स्वप्ने पाहिली त्याची पुर्तता झाली नाही. तर नवेच प्रश्न निर्माण झाले ग्रामीण भागावर अनेक अस्मानी सुलतांनी चक्र फिरु लागले १९७२ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला. तेव्हा शासनाने परिस्थिती योग्य पध्दतीने हाताळली नाही. राजकारण मुल्यहीन झाले, भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला, औद्योगिकरण आले. यांत्रिकीकरण आले बेकारीचा प्रश्न निर्माण झाला. ग्रामीण भागातले अनेक लहान उद्योगधंदे बंद पडले. जुनी बलुतेदारी अलुतेदाराची व्यवस्था मोडीत निघाली.

यातून अनेक समस्या निर्माण झाल्या. शिक्षण व्यवस्था मुल्यहीन झाली. शेतमजुर व शेतक-यांच्या पोटाचा प्रश्न निर्माण झाला बी-बीयाने औषधे यांच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाली. पिकांना योग्य भाव नाही. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने सहकारी सोसायट्या बँक हे सर्व आले व त्यांनी प्रश्न सोडवण्या एवजी नवीन प्रश्नांची भरती केली. अशा अनेक प्रश्नांच्या निर्मितीमुळे ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला. मानवी जीवनात जीवन जगत असतांना अनेक घटना प्रसंग घडत असतात आणि त्यांचे परिणाम मानवी जीवनात होत असतात. ह्या घटना आणि साहित्यातुन व्यक्त होणारे जीवन अनुभव याचा संबंध हा असतोच. तो लक्षात घेतला तर चळवळीच्या उदयाच्या कारणाचा शोध लागतो. दलित साहित्यामागे डॉ. आंबेडकरांसारखी प्रेरणादायी विभुती आहे. भारतीय सामाजिक विषमतेविषयी मानवनिर्मित जातीपातीच्या उतरंडीविषयी तीव्र संताप आहे. समाजाने दलितांवर केलेल्या अन्याय अत्याचारातुन दलित साहित्य चळवळ उदयाला आली स्त्रियांना सुध्दा त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी, स्वतंत्रपणे स्त्री अस्तित्व निर्माण करण्यासाठी स्त्री साहित्याची चळवळ निर्माण करावी लागली. या दृष्टीने जर ग्रामीण साहित्य चळवळीचा विचार केला तर शोषीत, दारिद्रय अन्यायग्रस्त ग्रामीण माणसाच्या जाणीवा घेऊनच ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला आहे. ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या उद्देशासंदर्भात व तिच्या परिणामाच्या संदर्भात रा.रं. बोराडे म्हणतात, ''१९७०-१९७२ नंतर नागरेतर साहित्याच्या स्वरुपात झपाट्याने बदल होत गेला या काळानंतर विविध वाड्.मयीन चळवळी अस्तित्वात येऊ लागल्या या चळवळी

पैकी दलित साहित्य चळवळ ग्रामीण साहित्य चळवळ जन साहित्य चळवळ आदिवासी साहित्य चळवळ, स्त्रीमुक्तीवादी साहित्य चळवळ या वाड्मयीन चळवळी प्रमुख होत. या विविध वाड्.मयीन चळवळी मुळे नागरेतर साहित्याच्या मुलभूत स्वरुपाचा बदल झाला या चळवळी जन्माला येण ही मराठी साहित्याच्या इतिहासातही अभुतपुर्व घटना आहे. या चळवळीमुळे लेखकांच्या स्वभावाविषयीच्या जाणीवा अधिक प्रखर झाल्या''[४].

ग्रामीण साहित्याची चळवळ ही १९७७ च्या दरम्यान उदयाला आली. सुरुवातीला शिबिरे, साहित्य संमेलने यांच्या रुपाने ही चळवळ सुरु झाली १९७७ साली चळवळीचा पहिला मेळावा पुण्यात भारती विद्यापीठात झाला. भारती विद्यपीठाच्या सहकार्याने आनंद यादव यांनी हा मेळावा घडवून आणला. तेव्हापासून या चळवळीच्या कार्याला प्रारंभ झाला असे म्हणता येईल. डॉ. नागनाथ कोतापल्ले रा.रं. बोराडे, डॉ. आनंद यादव, द.ता. भोसले, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे या सर्वांनी या चळवळीला गती देण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी अनेक ग्रंथ लिहून या चळवळीचे उद्दिष्ट व भुमिका कशी असली पाहिजे हे सांगितले.

ग्रामीण जीवनमानात दिवसेंदिवस बरेच परिवर्तन घडून येत आहे. हे परिवर्तन साहित्यातुन नव्या संवेदनशील जाणीवेतुन लिहिले जात आहे. खेड्यातील बदल हा केवळ भौतिक स्वरुपाचा नाही. तर भौतिक स्वरुप बदलले की त्याचा परीणाम मानसिकतेवरही होत असतो. तेव्हा जुन्या प्रश्नाबरोबर नवीन प्रश्न आस्तित्वात आले. याला समोर जाण्याचे काम म्हणजे या समस्यातून मार्ग काढण्याचे काम ग्रामीण साहित्यिक आपल्या साहित्य चळवळीतुन करत आहेत. १९८० नंतर तर या जीवनात खुपच बदल झाले आहेत. ते भास्कर चंदनशिव यांच्या कथेतून तसेच डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, अनुराधा गुरव, श्रीराम गुंदेकर, उत्तम बावस्कर आवटे गणेश, गणेश धांडगे यांच्या लेखनातून उमटलेले दिसतात. ग्रामीण साहित्य चळवळीच्या संदर्भात आपली भूमिका मांडतांना मोहन पाटील म्हणतात, ''खेडोपाडी गावागावात कशाही स्वरुपात साहित्य विषयक ही जी शिबीरे छोटी संमेलने भरत राहिली त्यालाच ग्रामीण साहित्याची चळवळ असे म्हटले जाऊ लागले. मराठी साहित्याला समृध्द करण्यात त्या साहित्याचा मोठा वाटा आहे. चळवळीचे काय झाले ? हा प्रश्न गौण आहे. पण वास्तववादी दृष्टी- कोणातून मराठीत जी साहित्य निर्मिती होत राहिली त्यामागे एक ग्रामीण साहित्य चळवळीची प्रेरणा आहे. हे मान्य करावे लागते''[५].

ग्रामीण साहित्य चळवळीमुळे मोठ्या प्रमाणात ग्रामीण साहित्य निर्मिती झाली आणि एकूणच मराठी साहित्यात समृध्द झाले ग्रामीण साहित्य चळवळीच्या स्वरुपाविषयी आपली भूमिका मांडतांना डॉ. वासुदेव मुलाटे पुणे विभागीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते, ''ग्रामीण साहित्याला विद्रोहाचे वावडे नाही परंतु हा विद्रोह विधायक हवा नुसत्या विद्रोहात मोडतोड असते. अराजक असते. ग्रामीण साहित्याची चळवळ उत्क्रांतीवादी चळवळ आहे. ज्या देशात ज्या समाजात संस्कृतीत राहायचे आहे. तो देश तो समाज, त्या समाजाचा धर्म संस्कृती समुळ नाकारून जीवनातील प्रश्न सुटतात असे नाही म्हणून जीथे राहायचे आहे तो धर्म तो समाज ती संस्कृती यांच्यात आवश्यक सुधारणा करणे महत्वाचे असते. या सुधारणेसाठी प्रतिगामी शक्ती विरुध्द पुकारलेला लढा विधायक विद्रोहच असतो असे मी मानतो''[६].

ग्रामीण साहित्य चळवळ आणि दलित साहित्य चळवळीचा संबंध हा त्या त्या जीवनाशी आहे. एका विशिष्ट काळात या चळवळींचा उदय झाला या दोन चळवळींचा तुलनात्मक विचार केला तर ग्रामीण साहित्याची चळवळ अगोदर सुरु व्हायला पाहिजे होती कारण ग्रामीण साहित्याच्या निर्मितीचा प्रारंभ १९२० पासून झालेला आहे. याच बरोबर गांधीजींच्या विचाराची पार्श्वभुमी या दरम्यानची आहे. तर महात्मा फुले यांच्या विचाराचा ठेवा, 'शेतक-यांचा आसुड' या सारख्या ग्रंथाची पार्श्वभूमी प्रखरपणे असूनही या साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला नाही. तर ग्रामीण जीवनातील विशेषतः शेतीच्या संबंधाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने फार उशीरा या चळवळीला आरंभ झाला आहे. 'शेती मालाला योग्य भाव' मिळाला पाहिजे अशा पध्दतीने या चळवळीने बाळसे धरले. एकंदर भारतीय समाजाचा विचार केला तर तो फार सहनशील आहे. शोषीत आहे कीती ही अन्याय झाले तरी तो क्रांतिची, परिवर्तनाची भाषा करत नाही. अंगतिक होऊन जे वाट्याला येईल ते भोगतो. आजही शेतकरी बंड न करता आत्महत्या करतांना दिसतो अशा समाजात चळवळी लवकर उभ्या राहातांना दिसत नाहीत. अशा मानसिक अवस्थेमुळेच कदाचित ग्रामीण साहित्याची चळवळ उशीरा म्हणजे शिक्षणाच्या परिणामामुळे थोड्या फार प्रमाणात अस्तित्वात आली एकतर ग्रामीण साहित्याची चळवळ उशीरा चालू झाली. पण नंतरही या चळवळीला विरोध झाला या चळवळीवर टीका होत होती. या विरोधात फारसे तथ्य नाही पण ; विरोध मात्र झाला. मात्र दलित साहित्य चळवळीला विरोध म्हणूनही ही चळवळ सुरु झाली. दुसरा एक गंभीर आरोप म्हणजे ग्रामीण साहित्य चळवळीला आणि साहित्याला तत्वज्ञान नाही म्हणून तीला चळवळ म्हणता येत नाही. कारण कोणतीही चळवळ ही कोणत्यातरी तत्वज्ञानावर उभी राहत असते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या तत्वज्ञानाच्या अंगाने डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी असे विचार मांडले आहेत. ते म्हणतात, ''ग्रामीण साहित्याला कांही तत्वज्ञान नाही म्हणून ती चळवळ होऊ शकत नाही. असे म्हटले गेले, वस्तुत म. फुले विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आणि आता शरद जोशी यांनी ग्रामीण जीवनाबद्दल जीवन परीवर्तनाबद्दल फार सखोल विचार केला आहे. ग्रामीण जीवनात परिवर्तन झाल्याशिवाय देशाचे परिवर्तन शक्य नाही अशी विचार धारा मांडली आहे''[७].

ग्रामीण जीवनाचे चित्रण फार पुर्वीपासून साहित्यातून येत होते. पण चळवळ मात्र आकाराला येत नव्हती ग्रामीण साहित्याची चळवळ उभी न राहण्याची अनेक कारणे आहेत. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी या चळवळीच्या पाठीमागे तत्वज्ञान सांगातांना जो विचार मांडला त्यात म. फुले डॉ. आंबेडकर , वि.रा. शिंदे यांचे विचार येऊनही पुढे अनेक वर्ष ही चळवळ अस्तित्वात येऊ शकली नाही. जीवनातील प्रश्न जेव्हा गंभीर स्वरुप धारण करतात त्यावेळेस लोक त्याकडे लक्ष देतात असेच कांही या संदर्भात म्हणता येईल. १९७५ नंतर ही चळवळ उदयाला

आली याचा अर्थ जेव्हा समस्या गंभीर होऊन साहित्यात येतात त्या साहित्याला चळवळीचे स्वरुप प्राप्त होते. म्हणजे जीवन आणि साहित्य यातील अंतर कमी होते. तेव्हा या साहित्याला चळवळीचे स्वरुप प्राप्त होते.

१९२५ नंतर निर्माण झालेले साहित्य हे वास्तवापासून बरेच दूर होते. त्यामुळे जीवन आणि साहित्य यात खूप अंतर होते त्यामुळे चळवळ उदयाला आलेली दिसत नाही. ग्रामीण साहित्याची चळवळ कितीही उशीरा सुरु झाली आणि त्या चळवळीच्या पाठीमागे कोणतेही तत्वज्ञान असो पण या साहित्याच्या चळवळीचे साहित्यावर चांगले परिणाम मात्र झालेले दिसतात. या चळवळीमुळे ग्रामीण लेखकांना मात्र ग्रामीण जीवनाबद्दल नवे भान आले आहे.

चळवळीच्या उदयानंतर ग्रामीण जीवनातला बराचसा भाग जो साहित्यात यायचा बाकी होता तो भाग आणि अनेक छोटे छोटे प्रश्न साहित्यातून येऊ लागले उदा. पाणबळी, तिची वाटच वेगळी, अंगारमाती, लगाम, रक्त आणि पाऊस या कथातुन बऱ्याच सुक्ष्म समस्यांचे चित्रण आले आहे. परंतु ग्रामीण साहित्याची चळवळ ही काही पुर्णत :वाड्.मयीन चळवळ नाही तर शोषीत अशा जीवन जगणा-या म्हणजे त्यांच्या प्रश्नांच्या सोडणूकीच्या दृष्टीने ही चळवळ आली आहे. ग्रामीण जीवनात खूप मोठे परिवर्तन होत आहे. या आधुनिक परिवर्तनामुळे ग्रामीण समाजात अनेक नवे प्रश्न नवी आव्हाणे येत आहेत. हे सर्व प्रश्न ग्रामीण साहित्यातून माडतांना हे ग्रामजीवन हे इतर जीवनापेक्षा कसे वेगळे आहे. हे या चळवळीने सांगितले तिस-या पिढीच्या साहित्यिकांना आत्मभान देण्याचे काम या चळवळीने केले. नव्या पध्दतीची मूल्य स्वीकारुन जीवनाची चळवळ आली आहे. या संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे यांचे विचार अशा स्वरुपाचे आहेत. ‘‘ही ग्रामीण जनता ही साधन संपत्ती निर्माण करते तिचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सर्वाधिक वाटा असतो. त्यामुळे या देशातील कोणतेही प्रश्न आणि समस्या येथील सुधारणा आणि विकास, देशाचे एकूण भवितव्य इ. विचार करतांना या ग्रामीण जनतेला तिच्या समाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक स्थितीला व प्रश्नांना केंद्रस्थानी माणून विचार झाला पाहिजे अशी ग्रामीण साहित्य चळवळीची भूमिका आहे. म्हणून म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स यांच्या तत्वज्ञानाचा समन्वय साधून संपुर्ण समाजाची पुर्णमांडणी ग्रामीण साहित्य चळवळ करू इच्छिते ते या पूर्णमांडणी मध्ये शहरे व शहरामधील सर्व प्रकारचे उद्योगधंदे विविध समाजापयोगी संस्था शिक्षण व्यवस्था, सुधारणा यांची दिशा ग्रामीणांच्या विकासाकडे नेणारी असली पाहिजे असे ग्रामीण साहित्य चळवळीची धारणा आहे’’[८].

डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ‘‘ही चळवळ कोणतीही पारंपरिक धर्म, पंथ, जात वर्ण वर्ग, स्त्रीदास्य गुलामगिरी, विषमता आणि त्यावर आधारीत असलेल्या कोणत्याही संस्था संघटना यांच्या विरोधात आहेत. समता स्वातंत्र्य बंधुता, आधुनिकता विज्ञाननिष्ठता लोकशाही आणि मानवता ही मूल्य चळवळ जतन करु इच्छिते ही मूल्य मानणारे त्यांचा विकास करू पाहणारे त्यासाठी संवाद घडू शकणारे त्यांना पुरक असलेले असे सर्व विचार चळवळीने स्वीकारलेले आहेत’’[९].

ग्रामीण जीवन हे केवळ मनोरंजनाचे विषय नसून, त्याकडे केवळ नवा विषय म्हणून न पाहता गांभीर्याने पाहिले पाहिजे. याचे भान साहित्यिकाला आणून देण्याचे काम ग्रामीण साहित्य चळवळीने केले लेखकांमध्ये एक नवे आत्मभान जागृत केले.

आज शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून होत आहे. त्यामुळे शिकलेली नवीन साहित्यिकांची पीढी तयार होत आहे. ज्या पीढीने ग्रामीण जीवन प्रत्यक्ष अनुभवलेले आहे. त्यामुळे ते साहित्यातुन वास्तवतेने येतांना दिसत आहे. आणि ग्रामीण साहित्यही मोठ्या प्रमाणात लिहिले जात आहे.

### संदर्भ सूची


१. यादव, (डॉ.) आनंद - मराठी साहित्य समाज आणि संस्कृती - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्र.आ.२०००, पृ. ६८.
२. सर्विकर , (डॉ.) कैलास (संपा.) - साहित्य ग्रामीण आणि दलित (संपा. नंदपूरे इश्वर) - विजय प्रकाशन, नागपूर. प्र.आ. सप्टें. २००२, पृ. १
३. मुलाटे , (डॉ.) वासुदेव - ग्रामीण साहित्य स्वरुप व दिशा - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद प्र.आ. जून १९९४, पृ. ३१.
४. बोराडे , (डॉ.) रा. रं. - ग्रामीण साहित्य - साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्र. आ. १९९२, पृ. ३२.
५. पाटील , मोहन - ग्रामीण साहित्य आणि संस्कृती - स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद द्वि.आ. २००८, पृ. ९२.
६. मुलाटे , (डॉ.) वासुदेव - ग्रामीण साहित्य स्वरुप व दिशा - कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद प्र.आ. १९९४, पृ. ४६.
७. कोत्तापल्ले , (डॉ.) नागनाथ - साहित्याचा अन्वयार्थ - मेहता पब्लिशिंग, पुणे प्र.आ. १९९६, पृ. ६८.
८. मुलाटे , (डॉ.) वासुदेव - नवे साहित्य नवे आकलन - मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्र.आ. १९९६, पृ. ३७.
९. मुलाटे , (डॉ.) वासुदेव - उनि, पृ. ३७.